# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## ( पुर्वीचे पुणे विद्यापीठ )

दुरध्वनी क्रमांक :
०२०–२५६०१२०१
२५६०१२०२

संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ कार्यालय
गणेशखिंड, पुणे ४११ ००७
Website :www.unipune.ac.in
e-mail : coe@unipune.ac.in


जा.क्र. पमूमं/२०२१/०३७ दिनांक: ०९/१०/२०२१

मा. प्राचार्य /संचालक
अभियांत्रिकी महाविद्यालय व फार्मसी महाविद्यालय
पुणे, नाशिक व अहमदनगर जिल्हा

विषय: तृतीय वर्ष आणि चर्तुथ वर्ष (इंजिनीअरिंग आणि फार्मसी)अभ्यासक्रमांच्या इन–सेमीस्टर परीक्षांचे आयोजन शनिवार दि. २९ ऑक्टो २०२१ पर्यत महाविद्यालय स्तरावर पूर्ण करणेबाबत..

महोदय,

शैक्षणिक वर्ष २०२१–२२ चे प्रथम सत्र नियमित सुरू आहे.अभ्यासक्रमात उल्लेख केल्याप्रमाणे तृतीय वर्ष (२०१९ पॅटर्न) आणि चर्तुथ वर्ष (२०१५ पॅटर्न) या अभ्यासक्रमातील मार्गदर्शक तत्वानुसार इन सेमीस्टर परीक्षांचे आयोजन ऑनलाईन/ऑफलाईन पध्दतीने घेणे आवश्यक आहे.

कोविड–१९ प्रार्दुभावाच्या परिस्थितीत संलग्नित महाविद्यालयांकडे असलेल्या सुविधांचा वापर करून संबंधित विद्यार्थ्यांस परीक्षा वेळापत्रकाचा तपशील वेळेत उपलब्ध करून त्या परीक्षांचे आयोजन इंजिनीअरींग कॉलेज व फॉर्मसी कॉलेज यांनी महाविद्यालय स्तरावर ऑनलाईन/ऑफलाईन पध्दतीने करावयाचे आहे.

विद्यार्थ्यांचे हिवाळी २०२१ परीक्षाकरिता आवेदन पत्र भरून घेण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर, संलग्नित महाविद्यालयांस परीक्षेची समरी उपलब्ध करून दिली जाईल. त्यानंतर इंटरनल मार्क्स वेबपोर्टल या संरक्षित संगणक प्रणाली मार्फत विद्यार्थ्यास इन–सेमीस्टर परीक्षेत मिळालेले गुण विद्यापीठाच्या परीक्षा विभागाच्या कॉम्प्युटर सर्व्हरवर भरणेची सुविधा संलग्नित महाविद्यालयांना उपलब्ध करून दिली जाईल.

मा. प्राचार्य /संचालक यांना विनंती करण्यात येते की या पत्राचा आशय संबंधित विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा–यांना अवगत करून दयावा आणि कार्यवाही करावी.

कळावे,

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ